## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

**तक्रार क्रमांक : ६२०/२०२२**

तक्रारकर्ता, श्री.रवि आनंद भोईर
रा.वेवुर, जांभुळ पाडा,
पालघर पुर्व, ता.जि.पालघर ४०१ ४०४

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा रचना सहायक
अनधिकृत बांधकाम विभाग, पालघर नगरपरिषद
ता.जि.पालघर ४०१ ४०४

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा रचना सहायक
अनधिकृत बांधकाम विभाग, पालघर नगरपरिषद
ता.जि.पालघर ४०१ ४०४

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा लिपीक
अनधिकृत बांधकाम विभाग, पालघर नगरपरिषद
ता.जि.पालघर ४०१ ४०४

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा लिपीक
अनधिकृत बांधकाम विभाग, पालघर नगरपरिषद
ता.जि.पालघर ४०१ ४०४

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २१/५/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २४/११/२०२१ | ८/२/२०२२ | २८/१२/२०२१ | ८/२/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.१४/२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिलेली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २१/५/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अजय संखे, सहायक नगररचनाकार, पालघर नगरपरिषद व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.अरूण गणपती जाधव, रचना सहायक, सह जिल्हा निबंधक वर्ग-१ ठाणे आणि श्री.उमाकांत सुरेश पाटील, लिपीक पालघर नगरपरिषद उपस्थित उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" *जा.क्र.पानप/बांध/नर/कार्या-३८९९/२०१९-२०२० मुख्याधिकारी यांचे कार्यालय बांधकाम विभाग दि.१८.०६.२०१९ रोजी मौजे वेवुर ता.जि.पालघर येथील स.नं.२० या भूखंडावर नैसर्गिक ओढयामध्ये नगरपरिषद तर्फे केलेल्या कामांचा तपशिल, अहवाल यांची पुर्ण माहिती*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.८/२/२०२२ रोजी सुनावणी घेऊन, "*माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती पुरविणे जन माहिती अधिकारी यांचेवर बंधनकारक आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांना सदरची माहिती ८ दिवसात उपलब्ध करून द्यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना दि.८/२/२०२२ रोजी माहिती दिली आहे. सदरची माहिती प्राप्त झाल्याचे तक्रारदार यांनी मान्य केले.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती देण्यात आल्यामुळे, तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ मे, २०२५ .

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**